नियमित फौ. ख. क्र.१११/२०२४
सरकार -वि.- चंद्रशेखरसिंह
नि.क्र. २७.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.५ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - दिपीका गजानन रेहपाडे,
वय ३५ वर्षे, व्यवसाय – मदतनीस,
राहणार – भिवापूर, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. फिर्यादी भारतीसिंह व आरोपी चंद्रशेखरसिंह यांना मी ओळखते. घटना ही दि.१२.०४.२०२४ रोजी सकाळी ९.१५ वा. फिर्यादीच्या घरी घडली होती. त्यावेळी मी खालच्या मजल्यावर राहत होते. त्यावेळी मी पाहिले की, फिर्यादी रडत रडत घराच्या बाहेर खाली आल्या. त्यावेळी फिर्यादीच्या हाताला व पायाला मार लागलेला होता. त्यावेळी फिर्यादीने मला सांगितले की, तिच्या पतीने तिला मारहाण केली. पोलिसांनी माझे बयान घेतले होते.

सरतपास संपला.

**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत**

२. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी बाहेर राहत होते. आरोपी बऱ्याच दिवसांनंतर घरी यायचे. हे म्हणणे खरे आहे की, दोन्ही पती पत्नी मिळून बाजारात खरेदीला जात होते. हे मला माहीत नाही की, दोन्ही पती पत्नी मिळून हॉटेलमध्ये जात होते. हे मला लक्षात नाही की, आरोपी व फिर्यादीमध्ये नेहमी भांडण होत होते किंवा नाही. हे म्हणणे खरे आहे की, मारहाणीची घटना माझ्या समक्ष घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी राहत असलेल्या घराच्या पायऱ्या वरुन एखादी व्यक्ती पडल्यास लागु शकते. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझी विचारपूस केली नव्हती. मी पोलिसांना बयान देताना फिर्यादी रडत रडत आले असे सांगितले होते. तसे माझ्या बयानात का नाही याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कामथे यांच्या घरी

किरायाने राहत नाही. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी आरडाओरड करत आली व तिला तिने मारहाण झाल्याचे सांगितले हे मी खोटे सांगत आहे.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक - ०७.०३.२०२६

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.